प्रेसनोट दिनांक –०८/०१/२०२४

''वनरक्षक किनिस्ता यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर यांनी लाच स्विकारताना ताब्यात घेतले बाबत''.

| | | |
|---|---|---|
| १ | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर |
| २ | गुन्हा नोंद कमांक | मोखाडा पोलीस ठाणे, जिल्हा पालघर |
| ३ | कलम | भ्र.प्र.अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| ४ | लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आरोपीत लोकसेवक भुषण आनंदा शेवरे, वय ३४ वर्षे, वनरक्षक, वनरक्षक कार्यालय किनिस्ता, परिमंडळ किनिस्ता, वनक्षेत्र खोडाळा, वनविभाग जव्हार, ता. मोखाडा जि.पालघर (वर्ग–३) |
| ५ | मागितलेल्या लाचेची रक्कम | ३०,०००/–रूपये. |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | ३०,०००/– रुपये |
| ७ | थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार हे वनविभागाच्या हद्यीतील रस्त्याचा वापर करून त्यांच्या ट्रॅक्टरमधुन अवैधरित्या वाळू वाहतुक करीत असताना आरोपीत लोकसेवक यांना मिळून आले असता त्या अवैध वाळू वाहतुकीच्या ट्रॅक्टरवर कायदेशिररित्या गुन्हा दाखल न करण्यासाठी आणि यापुढे भविष्यात तक्रारदार यांचा अवैध वाळू वाहतुकीचा व्यवसाय वनविभागाच्या हद्यीतून सुरळीत चालू देण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे दिनांक २१/१२/२०२३ रोजी १,००,०००/– रूपयांची मागणी करून त्यापैकी ३०,०००/–रूपये हे त्याच दिवशी स्विकारले व उर्वरित लाचेची रक्कम आरोपी लोकसेवक यांनी त्यांचे कार्यालयात घेवून येण्यास सांगून लाचेच्या रक्कमेची मागणी केली. त्यामुळे तक्रारदार यांनी दिनांक ०१/०१/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर कार्यालयाकडे तक्रार दिली.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दि.०२/०१/२०२४ रोजी पंचासमक्ष आलोसे हे उर्वरित लाचेच्या रक्कमेची मागणी करतात अगर कसे यांची पडताळणी केली असता, तक्रारदार यांचा अवैध वाळू वाहतुकीच्या ट्रॅक्टरवर कायदेशिररित्या गुन्हा दाखल न करण्यासाठी आणि यापुढे भविष्यात तक्रारदार यांचा अवैध वाळू वाहतुकीचा व्यवसाय वनविभागाच्या हद्यीतून सुरळीत चालू देण्यासाठी यापुर्वी तक्रारदार यांच्याकडून ३०,०००/–रूपये स्विकारल्याचे मान्य करून तक्रारदार यांच्याकडे पुन्हा ३०,०००/– रू. लाचेची मागणी करून ती दिनांक ०८/०१/२०२४ रोजी वनविभागाच्या परिमंडळ अधिकारी कार्यालय किनिस्ता, ता. मोखाडा येथे पंच साक्षीदार यांचेसमक्ष स्विकारली असता आलोसे भुषण शेवरे यांना १३:५५ वा.चे सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयाचे सापळा पथकाकडून रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर यांचेशी संपर्क करावा.

---


संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर प. ४०१ ४०४.
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– dypacbpalghar@gmail.com
ऑनलाईन तक्रार :– —
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री नं. :– 1064
दुरध्वनी कमांक :– 02525-297297
हॉट्स ॲप क. :– 9423884745, 9404218543


(दयानंद गावडे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर